**प्रसिद्धी पत्रक**

१. आदरणीय भारतीय सर्वोच्च न्यायालय (इथून पुढे **'न्यायालय'** असे संबोधले जाईल) यांनी *सुब्रता भट्टाचार्य वि. सिक्युरिटीज ऐन्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडीया (सीए क्र. १३३०१/२०१५)* या प्रकरणात व इतर संबंधित प्रकरणांचे बाबतीत २ फेब्रुवारी २०१६ रोजी एक आदेश जाहीर केला आहे. सदर आदेशानुसार, पीएसीएल लि. (इथून पुढे **'पीएसीएल'** / **'कंपनी'** असे संबोधले जाईल) यांनी खरेदी केलेल्या जमिनीची विल्हेवाट लावण्यासाठी भारताचे माजी मुख्य न्यायाधीश आदरणीय श्री. न्यायमूर्ती आर. एम. लोढा यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचे निर्देश सेबीला इतर गोष्टींसहीत देण्यात आले होते, जेणेकरुन विक्रीतून मिळालेली रक्कम कंपनीमधे आपले पैसे गुंतवणा-या गुंतवणुकदारांना परत करता येईल.

२. त्यानुसार सेबीने पीएसीएलच्या मालमत्तांची विक्री करण्यासाठी व विक्रीतून मिळालेली रक्कम कंपनीमधे आपले पैसे गुंतवणा-या गुंतवणुकदारांना परत करण्यासाठी वापरावी या हेतुने न्यायमूर्ती (निवृत्त) आर. एम. लोढा यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे (इथून पुढे **'समिती'** असे संबोधले जाईल).

३. सदर समितीने आपल्या विहीत कर्तव्यानुसार आतापर्यंत वसूल केलेल्या रकमेतून पीएसीएलच्या गुंतवणुकदारांना पैसे परत देण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे ठरविले आहे. सर्वप्रथम, पीएसीएलकडे रु. २,५०० पर्यंत येणे (मुद्दल) बाकी असलेल्या गुंतवणुकदारांचे दावे स्विकारण्याचे समितीने ठरविले आहे. असे स्पष्ट करण्यात येते की, परत मिळणारी रक्कम रु.२,५०० प्रति गुंतवणुकदार इतकीच असेल असे नाही, आणि आलेल्या दाव्यांची संख्या तसेच समितीकडे उपलब्ध असलेला निधी यांचा विचार करुन प्रत्येकाच्या वाट्यानुसार ती ठरविली जाईल.

४. उपरोक्त विषय लक्षात घेता, पीएसीएलकडे एकूण रु.२,५०० (प्रति गुंतवणुकदार) पर्यंत येणे बाकी (मुद्दल) असेल अशाच गुंतवणुकदारांना खालील तपशील **562632** या नंबरवर एसएमएसद्वारे पाठविण्यास अथवा हीच माहिती **http://sebicommitteepaclrefund.com/** या संकेतस्थळावर अपलोड करण्यास सुचविले गेले आहे.

- पीएसीएलच्या प्रमाणपत्रानुसार गुंतवणुकदाराचे नाव,
- दावा केलेली रक्कम (रु. मधे),
- दावा करणा-याचा मोबाईल क्रमांक,
- पीएसीएल स्कीम पेमेंट नोंदणी क्रमांक,
- पीएसीएलच्या प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत,
- आधार / पॅन क्रमांक,
- बँक खाते क्रमांक व आयएफएससी कोड,
- दावा करणा-या गुंतवणुकदाराला पीएसीएलकडून जमीन नेमून देण्यात आली होती का,
- पॅन कार्ड / आधार कार्ड यांच्या स्कॅन केलेल्या प्रती, आणि
- शेवटचे तीन व्यवहार दाखविणा-या आतापर्यंतच्या बँक स्टेटमेंटची स्कॅन केलेली प्रत. (अपलोड केलेल्या आतापर्यंतच्या बँक स्टेटमेंटमधे नाव, पत्ता, बँक खाते क्रमांक व आयएफएससी कोड स्पष्टपणे दिसत असला पाहिजे याची काळजी अर्जदाराने घ्यायची आहे.)

यासंदर्भात, परताव्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सविस्तर समजावणारा एक डेमो व्हिडीओ **http://sebicommitteepaclrefund.com/** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, असा अर्ज करण्यापूर्वी तो पाहण्यात यावा. गुंतवणुकदार आपल्या परताव्याच्या अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी <**044-395-71985**> या क्रमांकावर फोनदेखील करु शकतात.

५. गुंतवणुकदारांनी फक्त वरील परीच्छेद ४ मधे मागितल्यानुसारच माहिती पाठवावी, तसेच ती फक्त दिलेल्या नमुन्यानुसारच पाठवावी, इतर कोणत्याही नमुन्यात पाठवू नये, असे येथे सूचित करण्यात येते. समितीकडून विशेष सूचना प्राप्त झाल्याशिवाय गुंतवणुकदारांनी आपली मूळ पीएसीएल नोंदणी प्रमाणपत्रे देऊन टाकू नयेत, याबाबतदेखील त्यांना सावध करण्यात येत आहे.

६. परताव्यासाठीचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख **२८ फेब्रुवारी, २०१८** राहील.

XXXXXX